# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः11.04.2026** **वारः शनिवार**

---

1. जागतिक अस्थिरता आणि अनिश्चिततेच्या काळात भारत आणि मॉरिशसच्या भागीदारीला अनन्यसाधारण महत्व-परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांचं प्रतिपादन
2. थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांच्या दोनशेव्या जयंतीनिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन
3. आर्टीमिस दोन अवकाशयान पृथ्वीवर सुखरूप परतलं
4. मथुरेत नाव उलटून झालेल्या अपघातात 10 जणांचा मृत्यू आणि
5. आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेत भारतीय चमूची 16 पदकांची कमाई, महिला खेळाडूंची ऐतिहासिक कामगिरी

**<u>जयशंकर</u>**

जग विखंडीत झालं तरी हिंद महासागरातील राष्ट्रांनी मात्र अधिक एकसंध राहिले पाहिजे, असं प्रतिपादन मॉरिशसच्या दौऱ्यावर असलेले परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल केलं. सध्या असलेल्या जागतिक अस्थिरता आणि अनिश्चिततेच्या काळात भारत आणि मॉरिशस या सारख्या देशांच्या भागीदारीला अनन्यसाधारण महत्व आहे, असं ते म्हणाले. मॉरिशसमधल्या जवाहरलाल नेहरू रुग्णालयातील, मॉरिशसच्या पहिल्या विशेष 'मूत्रपिंड प्रत्यारोपण विभागा'चं त्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलं, त्याप्रसंगी ते बोलत होते. डॉ. जयशंकर म्हणाले की, एक विश्वासार्ह भागीदार म्हणून भारत नेहमीच मॉरिशसच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील. या मूत्रपिंड प्रत्यारोपण विभागाचं उद्घाटन ही एक ऐतिहासिक कामगिरी असल्याचं त्यांनी सांगितलं. जयशंकर यांनी पोर्ट लुईस इथं आयोजित नवव्या 'हिंदी महासागर परिषदे'तही सहभाग नोंदवला. हिंदी महासागर क्षेत्रातील सागरीसुरक्षा, प्रादेशिक स्थिरता आणि शाश्वत आर्थिक विकास यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यासाठी हिंदी महासागर परिषद हे एक प्रमुख व्यासपीठ आहे, असं ते या परिषदेत बोलताना म्हणाले.

**<u>महात्मा फुले जयंती</u>**

थोर समाज सुधारक क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांची आज दोनशेवी जयंती आहे. यानिमित्त, संपूर्ण राष्ट्र या महान समाजसुधारकाला अभिवादन करत आहे. 1827 मध्ये याच दिवशी जन्मलेल्या महात्मा फुले यांनी, आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांच्या सोबतीने, जातीय व्यवस्था आणि अस्पृश्यता निर्मूलनासाठी लढा देण्यासोबतच, महिलांचे शिक्षण आणि सक्षमीकरणाच्या कार्याला अग्रक्रमाने चालना दिली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि संसदेतील इतर प्रमुख सदस्य संसद भवन परिसरातील 'प्रेरणा स्थळ' येथे जोतिबा फुले यांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहतील. या निमित्ताने, देशभरात, अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आले आहे.

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्वीशताब्दी जयंतीच्या औचितत्याने, 11 एप्रिल 2026 ते 10 एप्रिल 2027 या कालावधीत महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये विविध शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबविण्याचा व्यापक कृती आराखडा महाराष्ट्र राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने जाहीर केला आहे. या उपक्रमांअंतर्गत, समता दौड,

ग्रामभेट, निबंध स्पर्धा, व्याख्याने, वेबिनार, परिसंवाद आणि चर्चासत्र अशा अनेक उपक्रमांचं आयोजन करण्यात येणार असून, स्त्री शिक्षण, सामाजिक न्याय आणि समतेच्या विचारांचा प्रसार करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. महात्मा फुले यांनी स्त्री-शिक्षणाचा पाया जिथे रचला, त्या पुणे शहरातील भिडे वाड्यात आज महात्मा ज्योतिराव फुले यांना अभिवादन करण्यात येणार आहे.

**<u>मांडविय</u>**

'निरोगी भारत, समृद्ध भारत आणि विकसित भारत' ही संकल्पना पूर्ण करण्यासाठी वैद्यकीय व्यावसायिकांसह, प्रत्येकाचं योगदान आवश्यक असून आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्यासर्वांची मोठी जबाबदारी आहे, असं प्रतिपादन केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी केलं. मांडवीय यांच्या हस्ते काल, पुण्यात, 'जन सेहत सेतू'शिबीराचं उद्घाटन आणि पोर्टलचं लोकार्पण करण्यात आलं, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी या शिबीरांमध्ये सहभागी झालेल्या सर्वडॉक्टर्स, सेवाभावी संस्थांचा सन्मान करण्यात आला.

**<u>भाजपा-जाहीरनामा</u>**

पश्चिम बंगाल मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी, भारतीय जनता पक्षाने काल आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध केला. 'संकल्प पत्र' या नावानं प्रकाशित या जाहीरनाम्यात महिला, युवावर्ग आणि सरकारी कर्मचाऱ्यांना मोठी आश्वासनं देण्यात आली आहेत. दरम्यान, पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू विधानसभा निवडणुकांच्या प्रचाराला वेग आला आहे. मतदारांशी संपर्क साधण्यासाठी, विविध राजकीय पक्षांनी आपल्या ज्येष्ठ नेत्यांच्या प्रचारसभा आयोजित केल्या आहेत.

**<u>परकीय चलनसाठा</u>**

गेल्या 3 एप्रिल रोजी संपलेल्या आठवड्यात, देशाच्या परकीय चलन गंगाजळीत, 9 अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा अधिक वाढ होऊन ती, सुमारे, 697 अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या पातळीवर पोहोचली. भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेल्या माहितीनुसार, एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात देशाच्या परकीय चलन साठ्यात चांगली सुधारणा दिसून आली असून, मागील आठवड्यातील घसरणीनंतर त्याने पुन्हा उभारी घेतली आहे.

**<u>प.आशिया-चर्चा</u>**

इराणने अमेरिकेबाबत दुटप्पी धोरण अवलंबू नये असा इशारा अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांनी दिला आहे. युद्धबंदीच्या वाटाघाटींसाठी आपल्या पाकिस्तान दौऱ्याची सुरुवात करताना ते काल बोलत होते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी, इराणचा संपूर्ण विनाश करण्याचा इशारा दिला होता; त्याला त्यांच्याच मंत्रीमंडळातील काही सदस्यांनी नाराजी दर्शवली होती. त्या पार्श्वभूमीवर, या संघर्षावर तोडगा काढण्याची जबाबदारी जे. डी. व्हान्स यांच्यावर सोपवण्यात आली असून, व्हान्स, इस्लामाबाद इथं, इराणसोबत होणाऱ्या चर्चेचं नेतृत्व करण्यासाठी काल पाकिस्तानला रवाना झाले. पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी काल राष्ट्राला उद्देशून केलेल्या दूरचित्रवाणी भाषणात, ही चर्चा उभयपक्षी निर्णायक ठरू शकते असं म्हटलं आहे.

दरम्यान, इस्राएल सोबत 14 एप्रिलला थेट चर्चा करणार असल्याचं लेबेनॉनचे राष्ट्राध्यक्ष जोसेफ आऊन यांनी म्हटलं आहे. इस्रायलच्या अमेरिकेतील राजदूतांनी, अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाच्या मध्यस्थीने वॉशिंग्टनमध्ये, लेबनॉनमधील वॉशिंग्टनच्या राजदूतांसोबत दूरध्वनीवरून चर्चा करून वाटाघाटींच्या अटींवर विचारविनिमय केला होता. लेबनॉनच्या विनंतीनंतर इस्रायलने काल थेट चर्चेला परवानगी दिल्याचे जाहीर केलं,मात्र, या संदर्भात अद्याप कोणतंही निवेदन जारी करण्यात आलेलं नाही.

दोन आठवड्यांच्या युद्ध विरामाच्या काळातही इस्त्राएल लेबेनॉन वर करत असलेले हल्ले आणि त्यात नागरिकांचा बळी जात असल्याबद्दल भारताने तीव्र चिंता व्यक्त केली आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी काल नवी दिल्लीत आंतर-मंत्रालयीन पत्रकार परिषदेला संबोधित केलं. लेबनॉनमध्ये सुमारे एक हजार भारतीय नागरिक वास्तव्यास आहेत. लेबनॉनमधील भारतीय दूतावास, तेथील भारतीय समुदायाच्या सुरक्षिततेसाठी आणि संरक्षणासाठी,केंद्र सरकारशी सातत्याने संपर्कात असल्याचं त्यांनी सांगितलं.

**आर्टीमिस**

अमेरिकेच्या ‘नासा’ अंतराळ संशोधन संस्थेने प्रक्षेपित केलेलं आर्टीमिस–दोन अवकाशयान, काल, त्यातील चारही अवकाशयात्रींसह पृथ्वीवर सुखरूप परतलं. या यांनातील अवकाशवीरांनी, आजपर्यंत मानवी दृष्टीला न दिसलेला चंद्राचा भाग पाहिला, तसंच सूर्यग्रहणदेखील पाहिलं. 10 दिवसांच्या या मोहिमेत, कमांडर रीड वाईजमन, पायलट व्हिक्टर ग्लोव्हर, क्रिस्टीना कोच आणि जेरेमी हॅन्सेन सहभागी झाले होते. सुमारे पन्नासहून अधिक वर्षांनंतर, चंद्राच्या दिशेनं प्रवास करणारी ही पहिली मानवसहित अंतराळ मोहीम ठरली आहे. या अवकाशवीरांनी, पृथ्वीपासून आतापर्यंत सर्वाधिक अंतर पार करण्याचा एक नवीन विक्रम प्रस्थापित केला.

**मथुरा-अपघात**

उत्तर प्रदेशातील मथुरेतील केसी घाट इथे, यमुना नदीत एक नाव उलटून झालेल्या अपघातात 10 जण मृत्युमुखी पडले. काल दुपारी झालेल्या या अपघातात, लुधियानातील भाविक प्रवास करत होते. लष्कर, राष्ट्रीय आपत्ति निवारण दल तसंच राज्य आपत्ति निवारण दलाची पथकं घटनास्थळी दाखल झाली असून, बाचावकार्य वेगाने हाती घेण्यात आलं. राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी तसंच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून, मृतांप्रति श्रद्धांजलि अर्पण केली आहे.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत, काल रात्री गुवाहाटी मधल्या बरसापारा क्रिकेट मैदानावर झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्स संघानं रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला सहा गडी राखून पराभूत केलं. विजयासाठी आवश्यक असलेल्या 202 धावांचं लक्ष्य राजस्थान रॉयल्सनं 18 षटकांत चार गडी गमावून साध्य केलं.

**मुष्टियुद्ध**

2026 आशियाई मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेची काल, मंगोलियातील उलानबतार इथे सांगता झाली. या स्पर्धेत, भारतीय चमूने, 5 सुवर्ण, तीन रौप्य आणि आठ कास्य पदकं पटकावत एकंदर 16 पदकांची कमाई केली. महिला मुष्टियोद्ध्यांनी या स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी करत, 10 पदकं पटकावली, ज्यात 4 सुवर्ण, दोन रौप्य आणि 4 कास्य पदकांचा समावेश आहे. काल झालेल्या पुरुषांच्या 50 किलो वजनी गटात, विश्वनाथ सुरेश याने सुवर्ण पदक पटकावलं, तर, सचिन सिवच याने 60 किलो वजनी गटात रौप्य पदक जिंकलं.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.